**अर्ज निशाणी क्रमांक १२ खालील आदेश**

**( पारीत दिनांक १४/१०/२०२५ )**

प्रस्तूतचा अर्ज वादीने *दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७* अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा जमीनीची वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेबाबत दाखल केले आहे. वादीने सदर अर्जान्वये बालिका रामानंद हजारे यांना प्रतिवादी क्र.४ म्हणून समाविष्ट करण्यासाठी व दाव्यातील कलम नं.४ नंतर कलम नं.४/अ, कलम नं.८ नंतर कलम नं.८/अ व कलम नं.१ नंतर कलम नं.१/अ असा मजकूर लिहिण्याची परवानगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कसल्याही प्रकारचा बदल होणार नसल्याचे कथन केले आहे. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०३.** सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रतिवादींना समन्स तामिल झाले नव्हते व सदर दाव्याची माहिती नव्हती म्हणून सदरचा अर्ज हा बेकायदेशीर आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जानुसार वादीने वादपत्रामध्ये सदर दुरुस्ती केल्यामुळे न्यायदानासाठी मदत होणार आहे असे कथन केले आहे. तसेच, त्याने नमुद केलेल्या दुरुस्त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा त्यामुळे प्रतिवादींच्या हक्कांना बाधा येणार नाही. जरी यदाकदाचित काही बाधा येत असेल तर प्रतिवादींना उलटतपासाची संधी उपलब्ध आहे. तरी सदरचा दावा ब–याच कालावधीपासून प्रलंबित असल्यामुळे न्यायाकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो;

# आदेश

१. वादीचा नि.क्र.१२ वरील अर्ज रु.२००/– च्या खर्चावर अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात प्रस्तावीत/नियोजीत दुरुस्ती १४ दिवसांत करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.10.16 17:15:58 +0530

**( श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– १४/१०/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.